**रजा नियम**

शासकीय अधिकारी/कर्मचारी यांना राज्य शासनाने राजपत्रातील अधिसुचनेद्‌वारा जाहीर केलेल्या सण व इतर सुट्ट्या वगळून प्रतीवर्ष महाराष्ट्र नागरी सेवा (रजा) नियम १९८१ अन्वये खाते प्रमुखाकडे अर्ज देऊन, तो मान्य झाल्यावर खालील प्रमाणे रजा उपभोगता येते.

**<u>सुट्टी:</u>** अ) महाराष्ट्र नागरी सेवा (रजा) नियम १९८१, प्रकरण २, नियम ९(२३) अन्वये परक्राम्य संलेख अधिनियम १८८१, कलम २५ अन्वये विहीत केलेली अथवा अधिसूचित केलेली सुट्टी.

ब) शासनाने राजपत्रातील अधिसूचनेद्‌वारा, शासकीय कार्यालय कामापुरते बंद ठेवण्याचा दिलेला आदेश.

**<u>रजा:</u>** महाराष्ट्र नागरी सेवा (रजा) नियम १९८१ अन्वये सक्षम प्राधिकाऱ्याने कामावर अनुपस्थित राहण्यास दिलेली परवानगी.

☞ हक्क म्हणून रजा मागता येत नाही.

☞ रजा मंजूर करण्यास सक्षम अधिकाऱ्यास आवश्यकतेनुसार रजा नाकारण्याचा/रद्द करण्याचा अधिकार असतो.

☞ शासकीय अधिकारी/कर्मचारी यांना सतत पाच वर्षाहून अधिक कालावधी करता कोणतीही रजा मंजूर केली जाणार नाही.

| **रजेचे नाव आणि नियम** | **किती दिवस** | **शेरा** |
|---|---|---|
| नैमित्तिक रजा (Casual Leave) (अचानक, आपत्कालीन खाजगी कामासाठी रजा) | १ जानेवारी ते ३१ डिसेंबर या कॅलेंडर वर्षात ८ दिवस | एकाच वेळी सुट्टीचा दिवस धरुन सलग ७ दिवसांपेक्षा जास्त रजा देता येत नाही. |
| अर्जित रजा (पूर्ण पगारी) (Earned Leave) महाराष्ट्र नागरी सेवा (रजा) नियम १९८१ चे नियम ५० अन्वये | २४० दिवस (एका वेळी सलग १८० दिवस) | एकूण कामाचे दिवस गुणीले १/११= येणारे दिवस. (२४० दिवसापर्यंत रजा खात्यात जमा करुन ठेवता येते.) |
| अर्ध पगारी रजा (Half pay Leave) महाराष्ट्र नागरी सेवा (रजा) नियम १९८१ चे नियम ६० अन्वये | सेवेच्या पूर्ण केलेल्या प्रत्येक वर्षासाठी २० दिवस | निलंबन काळ यात धरता येत नाही. |
| परिवर्तीत रजा (Commuted Leave) महाराष्ट्र नागरी सेवा (रजा) नियम १९८१ चे नियम ६१ अन्वये | देय असलेल्या अर्ध वेतनी रजेच्या निम्मे दिवस | कमाल ९० दिवस. (एकूण उपभोगलेली रजा ही अर्ध वेतनी रजेच्या दुप्पट दिवस खर्ची पडेल) |
| अनिर्जित रजा (Leave not due) महाराष्ट्र नागरी सेवा (रजा) नियम १९८१ चे नियम ६२ अन्वये | वैद्यकीय प्रमाणपत्र असल्यास, जेवढी अर्ध वेतनी रजा अर्जित होण्याची शक्यता असेल तितके दिवस | एकूण सेवेत कमाल ३६० दिवस. एका वेळेस ९० दिवस किंवा कमाल १८० दिवस. |
| असाधारण रजा (Extraordinary Leave) | तीन वर्ष सतत सेवा पूर्ण - ६ महिने | रजा खात्यावर कोणतीही रजा अनुज्ञेय नसेल तर किंवा विनंती वरुन. |

| | | |
|---|---|---|
| महाराष्ट्र नागरी सेवा (रजा) नियम १९८१ चे नियम ६३ अन्वये | पाच वर्ष सतत सेवा पूर्ण - १२ महिने<br>जिल्हा शल्य चिकित्सक यांच्या प्रमाणपत्रावर मानसिक आजार, कर्क रोग ई. साठी - १८ महिने. | वैद्यकीय प्रमाणपत्र आवश्यक. |
| परिवीक्षाधीन कर्मचाऱ्यास रजा<br>(Leave on Probation)<br>महाराष्ट्र नागरी सेवा (रजा) नियम १९८१ चे नियम ६४ अन्वये | -- | नियमानुसार रजा मिळण्याचा हक्क असेल. |
| निवृत्तीपूर्व रजा<br>(Leave to Preparatory to Retirement)<br>महाराष्ट्र नागरी सेवा (रजा) नियम १९८१ चे नियम ६६ अन्वये | सलग १८० दिवस किंवा एकूण सेवा कालात २४ महिने. | नियत सेवा निवृत्तीच्या तारखे पलिकडे जाणार नाही ही दक्षता घेऊन कमाल १८० दिवस. कमाल २४ महिने. |
| प्रसूती रजा<br>(Maternity Leave)<br>महाराष्ट्र नागरी सेवा (रजा) नियम १९८१ चे नियम ७४ अन्वये | कायम सेवेत असणाऱ्या महिला कर्मचाऱ्यास, जर तीन किंवा तीन पेक्षा अधिक मुले हयात नसतील तर अर्जाच्या तारखे पासून १८० दिवस. | किमान सेवेची अट रद्द करण्यात आली आहे. दोन वर्षापेक्षा कमी सेवा झालेल्या महिला कर्मचाऱ्यास सहा महिन्याच्या वेतनाच्या रकमे इतका बॉंड द्यावा लागेल.<br>♦अनाथ मुल दत्तक घेणाऱ्या महिला कर्मचाऱ्यास - ९० दिवस विशेष रजा अनुज्ञेय आहे.<br>♦सरोगसी पध्दतीने जन्मलेल्या आपत्याचे संगोपन करण्यासाठी महिला कर्मचाऱ्यास आपत्याच्या जन्म दिनांकापासून - १८० दिवस विशेष रजा सेवा कालात एकदाच अनुज्ञेय आहे. अशा महिला कर्मचाऱ्यास आपत्य नसावे तसेच तिने मुल दत्तक घेतलेले नसावे. |
| अपघाती/विशेष विकलांगता रजा<br>(Special Disability leave for Accidental Injury)<br>महाराष्ट्र नागरी सेवा (रजा) नियम १९८१ चे नियम ७६ अन्वये | -- | ♦अपघाती रजा २४ महिन्यांपेक्षा अधिक नाही इतकी रजा मिळण्याचा हक्क असेल.<br>♦विशेष विकलांगता रजा १२० दिवसांपेक्षा अधिक नाही इतकी रजा मिळण्याचा हक्क असेल. |
| रुग्णालयीन रजा<br>(Hospital Leave)<br>महाराष्ट्र नागरी सेवा (रजा) नियम | -- | २८ महिन्यांपेक्षा अधिक नाही इतकी रजा मिळण्याचा हक्क असेल. |

| | | |
|---|---|---|
| १९८१ चे नियम ७७ अन्वये | | |
| क्षय रोग/कर्क रोग/कुष्ठ रोग/पक्षघात रजा (T.B./Cancer/Leprosy/ Paralysis Leave) महाराष्ट्र नागरी सेवा (रजा) नियम १९८१ चे नियम ७९ अन्वये | -- | १२ ते २४ महिन्यांपेक्षा अधिक नाही |
| अध्ययन रजा (Study Leave) महाराष्ट्र नागरी सेवा (रजा) नियम १९८१ चे नियम ८० अन्वये | -- | एका वेळी १२ महिने. संपूर्ण सेवा कालात २४ महिने. |
| विशेष नैमित्तिक रजा (Special Casual Leave) | पिसाळलेला कुत्रा अथवा तत्सम जनावराने चावा घेतल्यास. | २१ दिवस विशेष नैमित्तिक रजा मिळू शकते. (वैद्यकीय दाखला आवश्यक) |
| विशेष नैमित्तिक रजा (Special Casual Leave) | स्वत: नसबंदी शस्त्रक्रिया केल्यास | ६ दिवस विशेष नैमित्तिक रजा मिळू शकते. (वैद्यकीय दाखला आवश्यक) |
| विशेष नैमित्तिक रजा (Special Casual Leave) | एकदा केलेली नसबंदी शस्त्रक्रिया अयशस्वी झाल्यामुळे दुसऱ्यांदा नसबंदी शस्त्रक्रिया केल्यास | ६ दिवस विशेष नैमित्तिक रजा मिळू शकते. (वैद्यकीय दाखला आवश्यक) |
| विशेष नैमित्तिक रजा (Special Casual Leave) | कर्मचाऱ्याच्या पत्नीने बाळंतपणानंतर लगेचच संतती नियमनाची शस्त्रक्रिया केल्यास | कर्मचाऱ्यास ४ दिवस विशेष नैमित्तिक रजा मिळू शकते. (वैद्यकीय दाखला आवश्यक) |
| विशेष नैमित्तिक रजा (Special Casual Leave) | कर्मचाऱ्याच्या पत्नीच्या बाळंतपणाव्यतिरिक्त अन्य वेळी संतती नियमनाची शस्त्रक्रिया केल्यास | कर्मचाऱ्यास ७ दिवस विशेष नैमित्तिक रजा मिळू शकते. (वैद्यकीय दाखला आवश्यक) |
| विशेष नैमित्तिक रजा (Special Casual Leave) | स्त्री कर्मचाऱ्याने बाळंतपणाव्यतिरिक्त अन्य वेळी संतती नियमनाची शस्त्रक्रिया केल्यास | स्त्री कर्मचाऱ्यास १४ दिवस विशेष नैमित्तिक रजा मिळू शकते. (वैद्यकीय दाखला आवश्यक) |
| विशेष नैमित्तिक रजा (Special Casual Leave) | कर्मचाऱ्याने स्वेच्छेने विनामूल्य रक्तदान केल्यास | कर्मचाऱ्यास १ दिवस विशेष नैमित्तिक रजा मिळू शकते. (वैद्यकीय दाखला आवश्यक) |
| विशेष नैमित्तिक रजा (Special Casual Leave) | राष्ट्रीय क्रिडा स्पर्धेत भाग घेण्यासाठी | कॅलेंडर वर्षात ३० दिवस विशेष नैमित्तिक रजा मिळू शकते. (क्रिडा अधिकाऱ्याचा दाखला आवश्यक) |
| विशेष नैमित्तिक रजा | कर्मचाऱ्याच्या पत्नीने | कर्मचाऱ्यास ७ दिवस विशेष नैमित्तिक |

| | | |
|---|---|---|
| (Special Casual Leave) | बाळंतपणानंतर किंवा अन्य वेळी केलेली नसबंदी शस्त्रक्रिया अयशस्वी झाल्यामुळे दुसऱ्यांदा नसबंदी शस्त्रक्रिया केल्यास | रजा मिळू शकते. (वैद्यकीय दाखला आवश्यक) |

XXXXXXXXXXXXXXXXXXXXXXXXX